महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.३४८/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
*मुंबई - ४०० ०१९.*

# प्रशासकीय परिपत्रक क्र. १२५ दिनांक २६.०९.२००७

विषय : न्यायालयाने दिलेल्या आदेशाची विहित कालमर्यादेत अंमलबजावणी करणेबाबत.

संदर्भ : सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-१००७/ प्र.क्र.२८/०७/१८ (रवका) दिनांक १०.०७.२००७.

......

शासनाच्या विविध स्तरावरील अधिकाऱ्यांकडून न्यायालयांनी दिलेल्या आदेशाचे पालन न्यायालयाने घालून दिलेल्या कालमर्यादेत होत नाही. तसेच, न्यायालयाने घालून दिलेल्या कालमर्यादेत आदेशाचे पालन करणे शक्य नसेल तर त्यासंदर्भात आदेशाचे पालन करण्यासंबंधी कालमर्यादा वाढवून देण्याकरिता देखील शासकीय अधिकाऱ्यांकडून न्यायालयांना विनंती केली जात नाही, असे न्यायालयाच्या निदर्शनास आलेले आहे.

२. श्रीमती वर्षा लक्ष्मण देशपांडे यांनी उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.१४२/२००४ वर झालेल्या सुनावणीच्या वेळी उच्च न्यायालय, मुंबई यांचे मुख्य न्यायाधीशाच्या खंडपीठाने/ न्यायालयाने दिलेल्या आदेशांचे पालन संबंधित अधिकाऱ्यांनी न्यायालयाने घालून दिलेल्या कायमर्यादेत करावे, तसेच न्यायालयाने घालून दिलेल्या कालमर्यादेत आदेशाचे पालन/अंमलबजावणी करणे शक्य नसेल तर योग्य ती कारणे नमूद करुन न्यायालयांना मुदतवाढ देण्याबाबत विनंती करण्यात यावी असे आदेश दिलेले आहेत.

३. कक्ष अधिकारी, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या क्र.संकीर्ण-२००७/सं.क्र.१३९२/ प्रशासन-४ दिनांक २७.०८.२००७ च्या पत्रासोबत प्राप्त झालेले सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे संदर्भिय शासन परिपत्रक सोबत जोडले आहे.

४. सर्व संबंधित क्षेत्रिय व निगम कार्यालयातील अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, मा.उच्च न्यायालयाने पारीत केलेले आदेश तथा सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

सोबत : वरीलप्रमाणे

(२६/९)२००७

*( सु. य. पाटील )*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत :

विभागीय स्तरावरील सर्व कार्यालयांना महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

*K/Adm.Circular F.N.348*
*19/09/07*

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-१००७/प्र.क्र.२८/०७/१८ (र. व का.),**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- १० जुलै, २००७.**

**परिपत्रक**

१ शासनाच्या विविध स्तरावरील अधिकाऱ्यांकडून न्यायालयांनी दिलेल्या आदेशाचे पालन न्यायालयाने घालून दिलेल्या कालमर्यादेत होत नाही. तसेच, न्यायालयाने घालून दिलेल्या कालमर्यादेत आदेशाचे पालन करणे शक्य नसेल तर त्यासंदर्भात आदेशाचे पालन करण्यासंबंधी कालमर्यादा वाढवून देण्याकरिता देखील शासकीय अधिकाऱ्यांकडून न्यायालयांना विनंती केली जात नाही, असे न्यायालयाच्या निदर्शनास आलेले आहे. श्रीमती वर्षा लक्ष्मण देशपांडे यांनी उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.१४२/२००४ वर झालेल्या सुनावणीच्या वेळी उच्च न्यायालय, मुंबई यांचे मुख्य न्यायमूर्तीच्या खंडपीठाने वरील बाबींची गंभीर दखल घेतली असून असे प्रकार यापुढे घडू नये आणि घडल्यास संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध नियमानुसार कार्यवाही करणे भाग पडेल असे सूचित केले आहे. मा.उच्च न्यायालयाने पारित केलेले आदेश खालीलप्रमाणे आहेत:-

"It is pointed out by learned counsel appearing for respondent No.5 that vide letter dated 7th June, 2007, due communication was made to the Principal Secretary, Revenue and Forest Department, State of Maharashtra informing him the directions of the Court as well as to pass an order. However, no meeting has been held and no order has been passed.

2. It is a matter of concern that number of cases have come to the notice of this Court where various Officers in the hierarchy of the Government are not obeying the orders of the Court and, in any case, not within the time allowed by the Court. There is no request for extension of time for valid and good reasons. Be that as it may, we have requested the Assistant Government Pleader to look into the matter and ensure that such instances are not repeated henceforth. In the event of persisting defaults, the Court would be compelled to take action in accordance with law against the erring officers. Let the Department of Personnel in the State of Maharashtra also issue a circular in this regard within two weeks from today. Copy of this order be furnished to the Advocate General today itself. Stand over to 12th July, 2007."

२. मा.उच्च न्यायालयाच्या वरील निरीक्षणाच्या अनुषंगाने न्यायालयांनी दिलेल्या आदेशाची विहित मुदतीत अंमलबजावणी करण्याच्या सूचना तसेच काही वाजवी कारणास्तव विहित मुदतीत न्यायालयांच्या आदेशाची अंमलबजावणी करणे शक्य नसल्यास योग्य ती कारणे नमूद करून न्यायालयांना मुदतवाढ देण्याची विनंती करण्याच्या सूचना या परिपत्रकान्वये देण्यात येत आहेत. उक्त सूचनांची संबंधितांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(संजय डबाळे)